हुरडा पार्टी
शालेय सहल व हुरडा पार्टी
आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.
मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

सेवेकरी भरती
१) सुपरवायझर- १ । २) पुजारी- १
३) शेतगडी जोडी- २ । ४) सफाई सेवेकरी- १
५) वॉचमन- ३ । ६) स्वयंपाक बाई-१
याप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे
होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा
पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट
संपर्क:- 8625050111

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १७८ वा | सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

## घोटाळा करणारा व्यक्तीच ठरवणार राजीनामा द्यायचा की नाही तर, सगळ्या यंत्रणा बंद करा

### अंजली दमानिया यांची टीका

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची सातत्याने मागणी होत आहे. यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यायचा की नाही, हे स्वतः धनंजय मुंडे यांनी ठरवावं, असं वक्तव्य पुण्यात पत्रकारांशी बोलताना केलं.

त्यांच्या याच वक्तव्यावर सामाजिक कार्यकर्ता अंजली दमानिया यांनी टीका केली आहे. घोटाळा करणारा व्यक्तीच ठरवणार राजीनामा द्यायचा की नाही तर, सगळ्या यंत्रणा बंद करा, असं त्या म्हणाल्या आहेत.

अंजली दमानिया म्हणाल्या की, ह्वअजित पवार जे म्हणाले, ते एकूण पुन्हा एकदा धक्का बसला. त्यांचं असं म्हणणं होतं की, धनंजय मुंडे यांनी ठरवावं त्यांनी राजीनामा द्यायचा की, नाही. असचं असेल तर सगळ्या





यंत्रणा बंद करून टाकाव्यात. चौकशीही बंद करून टाकावी. पोलिसांसह सगळ्या यंत्रणांना आता आराम द्यावा. जो दहशत करतो, जो घोटाळे करतो, तो ठरवेल त्याचा राजीनामा घ्यायचा की नाही. हे पक्ष, मुख्यमंत्री नाही ठरवणार, मंत्रिपदाचा राजीनामा त्याने द्यायचा की, नाही हे तो व्यक्ती ठरवणार.ह्व

दमानिया म्हणाल्या की, आतापर्यंत आम्ही जे सगळं मांडलं आहे, ते मुद्देसूद मांडलं आहे. प्रत्येक गोष्टीचे पुरावे दिले आहेत. या सगळ्या गोष्टींची चौकशी करायची सोडून तुम्ही आज जर मनात असाल की राजीनाम्याचं त्यांना ठरू दे, तर हे हास्यास्पद आहे.'

**काय म्हणाले अजित पवार?**

अजित पवार म्हणाले की, 'बीडला घडली, ती अतिशय निंदनीय आहे. माणुसकीला काळिमा फासणारी आहे. त्यामुळे त्यात जे कोणी दोषी असतील त्यांना शिक्षा केली जाईल. कुणालाही सोडले जाणार नाही.' ते म्हणाले, 'आरोप जर सिद्ध झाला किंवा चौकशीत देखील आरोपाची सुई तिथपर्यंत पोहोचली, तरच आपण त्याबद्दलची कारवाई करणार. तुम्ही प्रश्न विचारला की, तुमच्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले, तेव्हा तुम्ही स्वतःहून राजीनामा दिला. जो तो स्वतःचा निर्णय स्वतः घेतो.'

## पंढरपुरात आढळले जीबीएसचे दोन रुग्ण

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर शहरात जीबीएसचे दोन संशयित रुग्ण आढळून आले आहेत. पहिल्यांदाच शहरात जीबीएसचे रुग्ण सापडल्याने शहरातील नागरिकांची चिंता वाढली आहे. दरम्यान या दोन्ही रुग्णांवर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती येथील उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षकांनी दिली आहे.

पंढरपूर शहरात एकावेळी जीबीएसचे दोन रुग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणाही खडबडून जागी झाली आहे. जीबीएस चा फैलाव रोखण्यासाठी आरोग्य विभागाने पंढरपूर शहरामध्ये होम टू होम पाहणी सर्वे सुरू केला आहे. दोन दिवसामध्ये सुमारे तीस हजार नागरिकांच्या आरोग्याची माहिती जमा केली आहे. यासाठी आरोग्य विभागाने शहराच्या विविध भागात १५ ते २० टीम तयार केल्या आहेत. त्यांच्या मार्फत कुटुंबाचा सर्वे सुरू आहे.

यामधून नागरिकांमध्ये जीबीएस आजाराविषयी जनजागृती करण्याचे काम देखील केले जात आहे. नुकतीच माघी यात्रा संपन्न झाली. यात्रेसाठी राज्यभरातून लाखो भाविक पंढरीत आले होते. यात्रा काळात (पान 2 वर..)

## न भूतो न भविष्यती! पारंपरिक वेशभूषा, भगवे फेटे, महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### शिवशोभा यात्रेने वेधले सोलापूरकरांचे लक्ष





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने यंदाच्या वर्षी पहिल्यांदाच उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांच्या संकल्पनेतून शिव शिभयात्रेचे आयोजन करणयात आले होते, रविवारी सकाळी दहा वाजता छत्रपती संभाजी महाराज चौकात पारंपरिक वेशभूषेत महिला दुचाकी सह शोभायात्रेत सहभागी होण्यासाठी जमू जमल्या, यावेळी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने महिलांना भगवे फेटे बांधण्यात आले, यावेळी छत्रपती संभाजी महाराज चौक येथील संभाजी महाराजांचे पूजन करून शिभयात्रेस सुरुवात करण्यात आली, ही यात्रा छत्रपती संभाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेकॅनिक चौक, नवी पेठ, राजवाडे चौक, चौपाड, मार्गे डाळींबी आड शिंदे चौक पर्यंत काढण्यात आली, शिवजयंती निमित्त महिलाची पारंपरिक वेशभूषेत आणि भगवे फेटे परिधान करून बाईक रॅली पहिल्यांदाच निघाल्याने बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

शोभायात्रा शिंदे चौक येथे समाप्त झाल्यानंतर शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या शिवमूतीर्ची आरती महिलांच्या हस्ते करण्यात आली यावेळी महिलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष केला. यंदाच्या वर्षी शिवजयंती निमित्त पहिल्यांदाच अशी शोभायात्रा निघाल्याने महिलांनी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ आणि उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांचे आभार मानले, आणि प्रत्येक वर्षी अशीच शोभायात्रा काढण्यात यावी अशी इच्छा व्यक्त केली.

शोभयात्रेचे पहिलेच वर्ष असून महिलांनी मोठया प्रमाणात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्याने उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांनी सर्वांचे आभार मानले.

**महिला पोलिसांचा सन्मान**

शिव शोभायात्रेत शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाने बंदोबस्त साठी असलेल्या महिला पोलिसांचा देखील फेटा बांधून सन्मान केला.

यावेळी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर नाना काळे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, राजन जाधव, पुरुषोत्तम बरडे, लहू गायकवाड, प्रकाश ननवरे, अंबादास शेळके, बाळासाहेब पुणेकर, महेश हनमे, सचिन स्वामी, जेलपेश घुले, देविदास घुले, बसवराज कोळी, तुषार गायकवाड, कृष्णा बुरळे सोमनाथ बनसोडे, राहुल मुद्दे, सिद्धाराम पाटील, मनीष अलकुंटे, शुभम अलकुंटे यांच्यासह शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोलापूरातील ७ मावळे करणार शिवजयंतीचे अवचित्त साधून १९ तास सलग राज्यशास्त्र दानपट्टा चालवण्याचा विश्वविक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी चार पुतळा समोर सदर विश्वविक्रमास पहाटे ठीक ५ वाजता सुरुवात होणार असून हा विश्वविक्रम रात्री १२.३० वाजता पूर्ण होईल ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोट्र्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य व भारतीय लाठी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमानाने या आगळ्यावेगळ्या ऐतिहासिक विश्वविक्रम आयोजित केला आहे. दांडपट्टा या शिवकालीन ऐतिहासिक ज्वलंत इतिहास लाभलेल्या शस्त्रास महाराष्ट्र शासनाने राज्यशस्त्र म्हणून दर्जा दिला आहे. नुसतं राज्यशस्त्र म्हणून नवे तर शालेय खेळामध्ये याचा समावेश व्हावा विद्यार्थ्यांना मदार्नी मैदानी खेळासह करिअरला



सुद्धा चान्स मिळावा यासाठी सदर विश्वविक्रम करण्यात येणार आहे. या विश्वविक्रमातून छत्रपती शिवाजी महाराज यांना त्यांच्या जयंतीचे औचित्य साधुन एक आगळावेगळा पद्धतीने मानवंदना सुद्धा देण्यात येणार आहे. सदर विश्वविक्रमपूर्वी चार पुतळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून सदर विश्वविक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने होणार आहे.

सदर विश्वविक्रम ट्रॅडिशनल दानपट्टा स्पोट्र्स असोसिएशनचे ७ मावळे १) श्लोक कोळी २) आदिनाथ खंडेराव. ३) सुयश हूच्चे.४) अरमान पटेल ५) दर्शन राजोबा.६) प्रतोष आळंद ७) अश्विन कडलासकार (प्रशिक्षक स्वतः) हे करणार आहेत यांना मुख्य प्रशिक्षक व ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोट्र्स असोसिएशनचे अध्यक्ष शिवराम भोसले व ट्रेडिशनल दाडपट्टा स्पोर्टस असोशियन चे उपाध्यक्ष सौ अंजना कडलासकर मार्गदर्शन प्रशिक्षण लाभले.

या विश्वविक्रमासाठी ऑक्टोबर २०२४ पासून या सात मावळ्यांचा सराव सुरू आहे. सदर विश्वविक्रमाची नोंद द आयडल इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड व युनिकॉन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये होणार आहे.

सदर विश्वविक्रमा चे उद्घाटन वेळ ठीक सकाळी ११ वाजता असणार आहे. आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, सरकारी वकील प्रदीप सिंह रजपूत, फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार, अॅड अविनाश कडलासकर, डबल उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, पैलवान युवराज सरवदे, ह.भ. प. विनोद महाराज सरवदे यांच्या हस्ते होणार आहे. या विश्वविक्रमासाठी दिवसभर विविध क्षेत्राचे मान्यवर भेट देऊन या मावळ्यांचा उत्साह वाढविणार आहेत. तमाम सोलापूरकर कारणानी सुद्धा या मावळ्यांना शुभ आशीर्वाद देण्यासाठी दिनांक १८ तारखेला उपस्थित रहावे असे ट्रॅडिशनल दानपट्टा स्पोट्र्स असोसिएशन यांच्यातर्फे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

## कौशिक गायकवाड यांना राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

### मोहोळ च्या मातीचा सुगंध हिमाचल प्रदेश मध्ये दरवळला

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करून देशहितासाठी झटणाऱ्या व लोकसेवेसाठी समर्पित असणाऱ्या भारत देशातील प्रतिभावंत व गुणवंत व्यक्तींना हिमाचल प्रदेश चे विद्यमान महामहिम राज्यपाल शिव प्रताप जी शुक्ला यांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने पुरस्कृत करण्यात आले. कल्पकता आणि सामाजिक उद्यमशीलतेची गुणवत्ता या श्रेणीतील निवडक व्यक्तींना हिमाचल प्रदेशची राजधानी शिमला येथे रेडिशन ब्लू या पंचतारांकीत हॉटेल मध्ये यानिमित्ताने पुरस्कृत



करण्यात आले. या अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुका येथील सामाजिक व सहकार क्षेत्रामध्ये सातत्यपूर्ण क्रियाशीलता जोपासून लोकसेवा (पान 2 वर..)

## दूषित बर्फाचा होतोय वापर

### घुंगरांच्या आवाजात रस पिणाऱ्यांनो वेळीच सावध व्हा!

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** उन्हाळ्याची चाहूल लागताच शहर परिसरात ग्रामीण भागात थंडपेय, रसवंतीगृह सुरु झाले आहेत.याशिवाय विविध ठिकाणी घुंगरांच्या आवाजात रसवंत्यांची चाके गरगरू लागले आहेत. रसवंतीवरील पाणी, ऊस तसेच बर्फाची शुद्धता ठेवली जाते का, असा प्रश्न अनेकांना पडतो.

देशात, राज्यात, शहरात, ग्रामीण भागात, खेडीपाडी, रस्त्यावर रसवंतीची थाटली असताना, बऱ्याच व्यावसायिकांना रीतसर परवानगीचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. विविध प्रकाराच्या थंड पेयांची थाटली जात आहेत. यात आईस्क्रीम, लस्सी, कोल्ड्रिंक, लिंबूपाणी आणि रसवंती आदी दुकानांचा समावेश होतो. यातील लिंबू -पाणी आणि रसवंती या ठिकाणी दिवसभरात मोठया प्रमाणावर बर्फाचा वापर



होत आहे. तो खाण्यायोग्य आहे की नाही याची मात्र तपासणी होताना अनेक ठिकाणी दिसून येत नाही.

**चार महिन्यात सिझनमध्ये परवानगीशिवाय व्यवसाय**

उन्हाळ्यात थंडगार प्रेयासाठी नागरिकांची पावलं वळतात. त्यामुळे या काळात चौकाचोकांत परवानगी घेता 'रसवंती' सुरु असल्याचे दिसून येतात.

**अनेकांना हवाय थंडगारच उसाचा रस!**

10 पैकी 9 ग्राहकांना बर्फ टाकलेलाच रस हवा असतो थंड रस पिणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे.

**विनबर्फाचा रस महाग का?**

1) अनेकदा रस घेताना तो बर्फाचा की विना बर्फाचा विचारले जाते. बर्फ वितलून त्याचे पाणी होते. त्यामुळे उसाच्या एका कांडक्यात जास्तच रस तयार होतो.

2) बिना बर्फाच्या रसासाठी जास्त ऊस लागतो, सोबतच अद्रक, लिंबू वेगळे टाकावे लागते. त्यामुळे त्यांना बिना बर्फ रस बर्फाच्या रसापेक्षा महाग विकला जात असल्याचे विक्रेते सांगतात.

जिजाऊ महिला मंडळ
तीर्थक्षेत्र अरण संचलित "यशोदा गुरुकुल" मध्ये खालील पदे भरावयाची आहेत.

जाहिरात

जिजाऊ महिला मंडळ तीर्थक्षेत्र अरण ह्या संस्थेत खालील पदे भरावयाची आहेत. इच्छुक व आवश्यक पात्रताधारक उमेदवारांनी अर्ज सादर करावेत.

१) प्राचार्य - M. A. B. Ed. (जागा १)
२) शिक्षक - B. A. B. Ed. (जागा- २)
३) शिक्षक - B. Sc. B. Ed. (जागा - १)
४) शिक्षक - H. S. C. / B. A. D. Ed. (जागा- ३)
५) लिपिक - Graduate (जागा - १)
६) शिपाई - S. S. C. (जागा - १)

इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज संस्थेच्या कार्यालयात समक्ष अथवा पोस्टाने दि. २०/०२/२०२५ पर्यंत पोहोचतील असे पाठवावेत.

कार्यालयाचा पत्ता-
'यशोदा निवास' छत्रपती शिवाजी महाराज चौक,
मु. पो. अरण, ता. माढा, जि. सोलापूर पिन - ४१३३०१.
सौ. सुनिता हरिदास रणदिवे
अध्यक्षा, जिजाऊ महिला मंडळ, तीर्थक्षेत्र अरण
भ्रमणध्वनी - ९४२२४२८८५७, ९९२१५९२१०१.

## विवेक लिंगराज यांचे पार्थीवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस विवेकानंद लिंगराज यांच्या पाथीर्वावर मोदी स्मशानभुमीत शोकाकुल वातावरणात अत्यंसंस्कार करणेत आले. जिल्ह्यातून तसेच राज्यभरातून अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सकाळी ११.३० वाजता शवविच्छेदनानंतर पार्थिव त्यांच्या राहत्या निवासस्थानी आणण्यात आले. खासदार प्रणिती शिंदे यांनी पाथीर्वाचे दर्शन घेतले. त्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी पुष्पचक्र वाहून अभिवादन केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, शिक्षणाधिकारी कादर शेख, मराठा महासंघाचे शाखाध्यक्ष अविनाश गोडसे, कर्मचारी संघटनेचे पंडित भोसले, सचिन घोडके, सुधाकर माने-देशमुख, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांचे सह अधिकारी व कर्मचारी यांनी पाथीर्वाचे दर्शन घेतले. दुपारी साडेचार वाजता पार्थीव (पान 2 वर..)

# बल्करचा टायर फुटला अन पलटी होऊन थेट गॅरेजमध्ये घुसला, तिघांचा जागीच मृत्यू, सोलापूर हळहळलं

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराजवळ असलेल्या सोलापूर-हैद्राबाद महामार्गावर शनिवारी (१५ फेब्रुवारी) सायंकाळी भीषण अपघात झाला आहे. अपघातामुळे सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात हाहाकार माजला होता. वेगात निघालेल्या सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्करचा टायर फुटला आणि बल्कर पलटी होऊन थेट गॅरेजमध्ये घुसला. गॅरेजमध्ये काम करणारे दोन कामगार आणि दुचाकीवर जाणारे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचा जागेवरच मृत्यू झाला.



**बल्कर पलटी होऊन सरपटत गेले**

सोलापूर-हैदराबाद महामार्गावर अपघातानंतर भीषण परिस्थिती निर्माण झाली होती. सोलापूर शहर पोलिसांनी ताबडतोब घटनास्थळी धाव घेत, क्रेनच्या सहाय्याने आटोकाट पर्याय करत पलटी झालेल्या बल्कर बाजूला केले आणि बल्कर खाली सापडलेले तीन मृतदेह बाहेर काढले. या भीषण अपघातात तोहिद माजीद कुरेशी (वय २०, रा. सरवदे नगर सोलापूर), आसिफ चांद पाशा बागवान (वय ४५, रा. दर्गे पाटील नगर, हैदराबाद रोड) तसेच विवेकानंद राजकुमार लिंगराज (रा. सोलापूर) अशी मृतांची नावे आहेत. विवेकानंद लिंगराज हे सोलापूर जिल्हा परिषदमध्ये कर्मचारी होते. पोलिसांनी तिन्ही मृतदेह शासकीय रुग्णालयात दाखल केल्यानंतर शासकीय रुग्णालयात मृतांच्या नातेवाईकांचा आक्रोश पहावयास मिळाला. यांची काय चूक होती असा सवाल नातेवाईक करत होते.

**टायर फुटला अन अनर्थ घडला**

घटनास्थळवरून मिळालेली अधिक माहिती अशी की, शनिवारी सायंकाळी सातच्या सुमारास बल्कर (क्रमांक एम एच 44 यू 7495) सोलापूरहून हैदराबादच्या दिशेने जात होता. बल्करचे टायर फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. टायर फुटल्याने बल्करने दुचाकीला धडक देत तो थेट उजव्या बाजूला असलेल्या गॅरेजमध्ये घुसला. यावेळी गॅरेजमध्ये काही लोक बसलेले होते. या सर्व लोकांना बल्करने चिरडले. जखमींवर छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ज्या परिसरात अपघात झाला, त्या रस्त्यावर वळण मार्ग आहे. हीच बाब या अपघाताला ही कारणीभूत ठरवल्याची प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले.

**सोलापूर हैदराबाद महामार्गावर शनिवारी मृत्यू तांडव**

सोलापूर शहरातील जोडभावी पेठ पोलीस ठाणे हद्दीत हॉटेल जगदंबा जवळ सोलापूरहुन हैद्राबादकडे जाणाऱ्या सिमेंट बल्कर वाहनाच्या टायरचा ब्लास्ट झाल्याने दुचाकी वाहनावर धडक देवून रस्त्याच्या दुभाजक ओलांडून बल्कर विरुद्ध दिशेला असलेल्या तोहिद बॉडी बिल्डिंग गॅरेजवर आदळला. अपघात इतका भीषण होता की प्रत्यक्षदर्शी नागरिक माहिती देताना सांगितले, हा तर मृत्यूचा तांडव होता. तिघांचा मृत्यू तर झालाच पण जखमीना बाहेर बाहेर काढताना प्रशासनाची दमछाक झाली. या अपघातात चौघे गंभीर जखमी झाले आहेत. वाजीद आसिफ कुरेशी (वय ४९), माजीद महेबुब चौधरी (वय ३० जखमी), करीम बादशा बेपारी (वय ३८ जखमी), बंडू पंत नागनाथ सुरवसे (वय ५२ जखमी) असे जखमी आहेत. रुग्णालयात त्यांवर उपचार सुरू आहेत.

# पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयाचा इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ




**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील रावगाव येथील पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयाचा इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महात्मा फुले समाज सेवा मंडळ संस्थेचे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद (बाबा) झिंजाडे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजीव गांधी वाचनालयाचे प्रमुख भास्कर पवार तसेच पालक प्रतिनिधी व प्रगतशील बागायतदार श्री भरत धगाटे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती प्रतिमा पूजनाने झाली.

मार्गदर्शन करताना प्रमोद (बाबा) झिंजाडे म्हणाले, ह्यह्यआयुष्यात नुसते जगायचे नसते तर प्रत्येक कृतीतून शिकत रहायचे असते. ज्ञानाची भूक ज्याला असेल आणि कुठलीही गोष्ट अध्यार्तून जो सोडत नसेल, त्याला यश मिळाल्याशिवाय राहात नाही. परिक्षेचा बाऊ न करता आत्मविश्वासाने सामोरे जावे असा बहुमोल सल्ला देवून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना भास्कर पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नेहमी स्वतःशी प्रामाणिक राहावे याचबरोबर शिक्षणा मधून आपल्याला जीवनामध्ये उत्कर्ष कसा साधता येईल यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय कोळेकर सर यांनी आपल्या प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना यश आणि अपयश या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून अपयश आलं तर खचू नका, कोलमडू नका, पुन्हा प्रयत्न करा यश नक्कीच तुमच्या पायाशी लोळण घेत येईल असे सांगितले, तर ज्येष्ठ शिक्षक किरण परदेशी सरांनी विद्यार्थ्यांना आवडेल त्या विषयात करिअर करा मात्र जिथे जाल तिथे कष्ट करा आपले व आपल्या आई-वडिलांचे तसेच शाळेचे नाव उज्वल करा असे प्रतिपादन केले, दहावीचे वर्गशिक्षक हनुमंत रासकर सर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधी सूचना दिल्या व उज्वल भवितव्याबद्दल शुभेच्छा दिल्या, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना प्रताप बरडे सर यांनी मोबाईल टीव्ही यासारख्या माध्यमांपासून दूर राहण्यास तसेच चांगल्या मित्रांची संगत धरण्यास सांगितले तसेच नवनियुक्त शिक्षक सुहास कानगुडे सर यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून शालेय जीवनातील अनुभव, शिक्षक तसेच शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयास अभ्यास दौऱ्यानिमित्त विद्यार्थीनींची भेट




**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे सद्गुरु कृषी महाविद्यालय मिरजगाव येथील अंतिम वर्षातील विद्यार्थिनींनी अभ्यास दौऱ्यानिमित्त भेट दिली. कृषी विद्यापीठामार्फत राबविल्या जाणाऱ्या कृषी पदवीच्या अभ्यासक्रमात अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांकरिता ग्रामीण कायार्नुभव व जागरुकता कार्यक्रम या अंतर्गत विविध शैक्षणिक संस्था, शासकीय विभाग, कृषी संलग्न व सामाजिक संस्थांना भेटी देऊन तेथील कार्यप्रणाली, नवीन तंत्रज्ञान, शेतीसंलग्न बाबी, कृषी आधारित उत्पादने याबद्दलची माहिती संकलित करणे असा अभ्यासक्रमाचा भाग आहे. याच अंतर्गत कृषी महाविद्यालय मिरजगाव येथील कु. शुभांगी नवले, कु. गौरी राऊत, कु. श्रावणी साळुंखे, कु. शुभांगी शेजुळ, कु. तन्वी शिरसाट, कु. प्रतीक्षा खेमनार आणि कु. साक्षी कादे यांनी लोकमंगल कृषी महाविद्यालयास भेट दिली. सदरील विद्यार्थिनींचा अभ्यास दौरा हा दिनांक १० ते १४ फेब्रुवारी असा पाच दिवसाचा असून यात सर्वप्रथम विद्यार्थिनींना महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व सोयी सुविधा, शैक्षणिक सुविधा, चालू असलेले विविध उपक्रम जसे की, गांडूळ खत प्रकल्प, रेशीम शेती, बायो-फटीर्लायझर निर्मिती, फळे व भाजीपाला उत्पादन, रोपवाटिका, माती पाणी तपासणी आणि दुग्धजन्य पदार्थ निर्मिती तसेच विविध प्रयोगशाळा या सर्व बाबीबद्दल कृषी विस्तार विभाग प्रमुख प्रा. प्रज्ञा कुदळे यांनी चित्रफितीच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. तसेच सर्व विद्यार्थिनींनी महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रास भेट देऊन विविध पिकांची माहिती आणि मॉड्युल अंतर्गत कार्यान्वित असणारे सर्व उपक्रम याची माहिती विभाग प्रमुख तसेच मॉड्युलच्या विद्यार्थ्यांकडून संकलित केली. सदरील विद्यार्थिनींना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी देखील मार्गदर्शन केले. या अभ्यास दौऱ्यामधून लोकमंगल कृषी महाविद्यालयात उपलब्ध व उत्कृष्ट पद्धतीने सुरू असलेल्या उपक्रमाबाबत असलेल्या सर्व गोष्टी जाणून विद्यार्थ्यांनींनी समाधान व्यक्त केले.

# दैनंदिन वापरात इंधन बचत केल्यास शाश्वत विकास शक्य- मंत्री आदिती तटकरे



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सौर ऊजेर्चा जास्तीत जास्त वापर करणे, तसेच दैनंदिन वापरात इंधनाची बचत केल्यास भविष्यासाठी ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्ट गाठता येईल, असा विश्वास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि राज्य शासनाच्या सहकार्याने हरित उजेर्चा वापर करून पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत सक्षम २०२४-२५ (संरक्षण क्षमता महोत्सव) १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंत्री कु.तटकरे बोलत होत्या.

कार्यक्रमास भारत पेट्रोलियम कार्पोरेशनचे बिझनेस हेड राहूल टंडन, हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशनचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक देबाशिश बसक, बीपीसीएलचे राज्य प्रमुख राकेश सिन्हा, इंडियन ऑईलचे व्यवस्थापकीय संचालक अभिजीत गिते, जीएआयएल इंडिया लि.चे उपसंचालक मोहम्मद शफी अवान, वरिष्ठ व्यवस्थापक दिपक वाघ, रितेश जाधव यांच्यासह अधिकारी आणि विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी रंगमंच समुहाच्या पथनाट्याद्वारे मुलांना इंधनबचतीचा संदेश देण्यात आला. तसेच इंधन बचतीसाठी यावेळी सामूहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महोत्सवास शुभेच्छा दिल्या.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, भारत सरकारने २०२५ पर्यंत इंधनात २० टक्के इथेनॉल मिश्रण अनिवार्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. जीवाश्म इंधनाचा वापर कमी करण्यास यामुळे सहाय होणार आहे. नवीकरणीय ऊर्जा सुरक्षितता वाढवणे आणि प्रदूषणमुक्त वातावरण तयार करणे हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे.

घरातही आपण गॅस, वीज वापर, योग्य पद्धतीने केला. इमारतींवर सौर पॅनल वापरले, सिग्नलला वाहन बंद करणे अशा छोट्या छोट्या प्रयत्नातून आपण इंधनाची बचत करू शकतो आणि शाश्वत विकास गाठू शकतो, असे महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी सांगितले.

राज्य समन्वयक उमेश कुलकर्णी यांनी सांगितले की, १४ ते २८ फेब्रुवारीपर्यंत तेल विपणन कंपन्या राज्यभरात संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी मोहीम राबविणार आहे. यामध्ये विद्यार्थी, तरूण, वाहन चालक, क्लिनर, कर्मचारी, शेतकरी, निवासी संस्था, ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्था अशा अनेकांपर्यंत पोहोचून इंधन बचतीचे महत्व, फायदे यासंदर्भात जागृती करण्यात येणार आहे. इंधन कार्यक्षम तंत्रज्ञान आणि पद्धतीचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध इंधन संवर्धन उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सायक्लोथॉन, वॉकेथॉन, चित्रकला स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा असे विविध उपक्रमांच्या माध्यमातून इंधन बचतीचा संदेश पोहोचविला जाणार आहे.

# कामती भागातील गावांची विजेची समस्या कमी होईल- आवताडे

## पीरटाकळी येथे ३३ के. व्ही. वीज केंद्राची भूमिपूजन



**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** उजनीच्या कालव्याचे जाळे व सीमा नदीचे वरदान असलेले कामती, विरवडे व तीरटाकळी भागातील अनेक गावे हरितक्रांतीने नटली आहेत. या भागाचा शेतकरी देखील समृद्ध आहे. मात्र या भागातील शेतकऱ्यांना विजेची समस्या नेहमीच भेडसावत होती. मोहोळ तालुक्यातील पीर टाकळी येथे ३३/११ केव्ही उपकेंद्राच्या मंजुरी व्हावे यासाठी भाजप जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली अथक प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊजार्मंत्री देवेंद्र फडणवीस व महावितरण चे संचालक विश्वाजी पाठक यांच्या सहकार्याने हे उपकेंद्र मंजूर झाले. त्यामुळे आता कामती भागातील शेतकऱ्यांना विजेची समस्या भेडसावणार नसल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टी युवा मोचार्चे तालुकाध्यक्ष अंकुश आवताडे यांनी केले.

तिर टाकळी (ता. मोहोळ) येथील मंजूर असलेल्या उपकेंद्राचे उद्घाटन ऊजार्मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्च्युअल माध्यमातून केले. तर मान्यवरांनी श्रीफळ वाढवून भूमिपूजन केले यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, या प्रकल्पामुळे कामती जिल्हा परिषद क्षेत्र व परिसरातील गावांना मोठा फायदा होणार असून वीजपुरवठा अधिक स्थिर व कार्यक्षम होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवश्यक वीज वेळेवर मिळणार असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर सकारात्मक परिणाम होईल. भाजप जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनामुळे व प्रयत्नांमुळे निधी मंजूर होऊन जागा उपलब्ध झाली. या संपूर्ण प्रक्रियेत त्यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल परसरातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करतो.

याप्रसंगी मोहोळचे उपकार्यकारी अभियंता किरण जाधव, पेनुरचे सहाय्यक अभियंता सुशिल देवकर, कामतीचे कनिष्ठ अभियंता आकाश बचुटे, सहाय्यक अभियंता महेश बारबोले, सरपंच अनिकेत पाटील, राष्ट्रवादीचे तालुका उपाध्यक्ष प्रमोद अवताडे, माजी सरपंच महेश धुमाळ, संतोष पाटील, अंगत पाटील, ज्ञानेश्वर पाटील, संदीप आवताडे, सोमा पाटील, विजय आवताडे, निवृत्ती गुऱ्हाळे, अशोक कुंभार, प्रकाश पाटील, रायगोंडा पाटील, विशाल निचरे, नितीन जाधव, जीवन म्हमाणे यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता +
नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..



(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


# माणदेशी कवी बाबासाहेब कोकरे यांचा शब्दांचे फटकारे कार्यक्रम संपन्न



**माण (कटूसत्य वृत्त):-** कुरणेवाडी जि. प. प्राथमिक शाळा कुरणेवाडी ता. माण येथे माणदेशी कवी बाबासाहेब कोकरे यांचा शब्दांचे फटकारे हा कार्यक्रम प्रशालेच्या वतीने प्रा काशिनाथ आटपाडकर यांच्या सहकायार्तून आयोजित करण्यात आला. यावेळी कोकरे यांनी स्वलिखित कविता चारोळ्या सादर केल्या व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.कवी कोकरे म्हणाले की लहान मुलांच्या मध्ये कवी साहित्यिक लेखक होण्याचे गुण असतात लहान मुले ही सहज यमक जुळवणाऱ्या आणि न जुळवणाऱ्या कविता करतात फक्त त्यांना एक प्रयत्न ,दिशा लागते आणि शब्दांचा साठा लागतो तो शब्दांचा साठा करण्यासाठी अभ्यास करावा लागतो. लहान मुलांच्या अंगी असणारे सुप्त गुण शिक्षकांनी ओळखले पाहिजेत. प्रशालेतील काही विद्यार्थ्यानी उत्तम प्रकारे कविता सादर केल्या. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे क्रियाशील सदस्य प्रा काशिनाथ आटपाडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले.यावेळी प्रशालेच्या वतीने कवी कोकरे आणि प्रा .आटपाडकर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक संजय गोरड उपस्थित होते. सहशिक्षक सोनवल यांनी सूत्रसंचालन केले तर सुवर्णरेखा फड यांनी आभार मानले.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नवी मुंबईतील राष्ट्रवादीतून भाजपवासी झालेले एक नेते २) विजेत्यास दिले जाणारे सन्मानचिन्ह, मेडल ३) पर्वा, चिंता ४) अवजड, बोजड ५) श्रीकृष्णाची माता ६) सश उलट लिहा ७) संजय दत्त अभिनीत एक चित्रपट, व्हिलन ११) गोमाता १२) बनावट, डुप्लीकेट १४) अंधार १५) संपत्ती, इस्टेट (हिंदीत) १६) जिंकणे, पराजयच्या विरूध्दार्थी १८) पुष्कळ, भरपूर १९) व्यक्ती २०) बॉडीगार्ड, किक चित्रपटाचा नायक २२) बारीकसारीक २४) महिना, माह २५) गरीबांचा फ्रिज, डेरा २७) एक उद्योगपती-*** टाटा २९) मनातील इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) पानाच्या विड्यात हा वापरतात ३१) ढग ३३) किमती वस्तू, ऐवज ३५) बेसन पीठ या द्विदल कडधान्यापासून बनते ३६) नवरा ३७) रूग्णालय ३८) दिवाळीत बनवितात ती तिखट व गोलाकार *** ३९) एक वनस्पतीजन्य तेल-**तेल ४०) तरचा साथीदार ४२) उमर (मराठीत) ४३) कोल्हापूरचे असलेले एक माजी मंत्री-विनय ** ४४) एक पेय, टी (मराठीत) ४५) एक हिंदी न्यूज चॅनल-आज **

**आडवे शब्द :** १) विधानसभेत पन्नास वर्षांहून जास्त काळ प्रतिनिधीत्व केलेले शेकापचे सांगोल्याचे दिवंगत आमदार ८) एक श्वसनरोग ९) एक तेल बी १०) आमीर खान अभिनीत एक चित्रपट १३) फलंदाजाने पूर्ण केलेल्या शंभर धावा १५) सीता १६) श्रीगणेशाचे एक नाव १७) नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची सामाजिक कार्य करणारी संस्था १८) तोटाच्या विरूध्दार्थी १९) सिंघम चित्रपटाचा नायक-*** देवगण २०) सैन्यातील प्रमुख शिलेदार २१) समाजवादी पार्टीचे निवडणूक चिन्ह २३) आश्चर्य, किमानच्या विरूध्दार्थी २५) मामाची बायको २६) फुलांची मोठी माळ, जीतच्या विरूध्दार्थी २८) कमी जास्त नसलेले, एकसारखे ३०) नदीचा तीर ३१) कष्ट, परिश्रम ३२) बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या खासदार- **** राणा कौर ३३) एक मराठी महिना ३४) सूर्य, मुलगा (इंग्रजीत) ३५) निश्चित, खात्रीशीर ३६) क्षण (हिंदीत) ३७) पाच दुणे ३८) गव्हाच्या पिठापासून बनविलेली गोलाकार ४०) लष्करातील सैनिक ४१) उत्पत्ती, वभ उलट लिहा ४३) याचे सरबत बनवितात ४४) हाताने सूत कातण्याचे पूर्वी वापरले जाणारे चक्राकार साधन ४६) सोनिया गांधी यांचा मतदारसंघ ४७) तीन दुणे ४८) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत

## सुडोकु - 178

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | 3 | 2 | | | 1 | | |
| | | 6 | | | 7 | 8 | | 2 |
| 1 | | | 3 | | | 7 | | 5 |
| 3 | 5 | 1 | | | 2 | | 8 | 4 |
| | | 7 | | 4 | | 6 | 1 | |
| 4 | 6 | | 8 | | 1 | | | |
| | | | | | 8 | 5 | 6 | 1 |
| | | 2 | 4 | 1 | 5 | | 7 | |
| 8 | | 5 | | 6 | | | | |

# सुमार दर्जाचे लोक मोठ्या पदावर कसे जातात? सरोदेंची शांतीश्री पंडित यांच्या वक्तव्यावर जोरदार टीका





**पुणे (कटूसत्य वृत्त):-** "सुमार दर्जाचे लोकं केवळ पीएच.डी. झाल्यामुळे मोठे होऊ शकतात का? या पुण्यातील एक शांतीश्री पंडित नावाच्या महिला, ज्यांच्यात शांतीही नाही आणि त्या पंडितही नाहीत, तिला 'जेएनयू'चे कुलगुरू केले, तिने काल पुण्यात भाषण केले, त्यात सांगितले की, विद्यापीठात डावे चळवळीचे लोक अधिक आहेत. अहो, तुम्हाला काही प्रॉब्लेम आहे का ? उजवे असू द्या, डावे असू द्या, मधले असू द्या,"अशी टीका सामाजिक कार्यकर्ते व विधीतज्ज्ञ ॲड. असीम सरोदे यांनी केली.

'आंतर भारती', पुणे आणि 'गोल्डनपेज पब्लिकेशन' तर्फे संविधान जागर ग्रंथमालिकेतील पुस्तकांच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. शांतीश्री पंडित या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विभागप्रमुख होत्या. त्या दोन वर्षांपासून 'जेएनयू'मध्ये कुलगुरू आहेत. शांतीश्री पंडित भाषणात म्हणाल्या होत्या की, मी पक्की संघाची आहे आणि संघामुळेच मी कुलगुरूपदी विराजमान झाले." यावरून चांगलीच चर्चा पुण्यात रंगली. त्यांचा समाचार सरोदे यांनी देखील या कार्यक्रमात घेतला.

सरोदे म्हणाले, त्या भाषणात म्हणाल्या की, जय श्रीराम बोला. आम्ही नाही बोललो तर काही प्रॉब्लेम आहे का ? खरंतर त्या कुलगुरू आहेत, त्यांनी धार्मिक बोलण्यापेक्षा जेएनयू मध्ये विद्यार्थ्यांनी काही चांगले प्रयोग केले, तर त्यावर बोलले पाहिजे. त्यांनी तिथे काही चांगले शैक्षणिक काम केले असेल तर त्याबद्दल बोलावे. ते काम इथल्या विद्यापीठाने करावे, राज्यात सर्वांनी करावे, असे त्यांनी बोलणे अपेक्षित आहे. 'जय श्रीराम' बोला आणि 'इन्शा अल्ला' बोलू नका, हे त्यांनी सांगितले म्हणे ! या सुमार दर्जाच्या लोकांमुळे आपणसंविधानाबद्दल बोललं तरी गुन्हेगार ठरवले जाऊ. आज खरंतर संविधानिक नैतिकतेबद्दल बोलायला जागा राहिली नाही."

संविधानाबद्दल सरोदे म्हणाले, संविधानाची तत्वे पाळण्याचे कार्य लोकांचे आहे, तसेच ते नेत्यांचे आहे. नेते संविधान हातात घेऊन दाखवतात. संसदेत एक नेता विचारतो की, संविधानात पाने किती? खरं तर पुस्तक तयार करताना ते कलोकशाही विरोधी घ्यायची, सरकारी संस्थांच्या मदतीने हैदोस घालायचा. तपास यंत्रणा हाताशी घेता आणि कोणाला अटक केली तर त्यांना का अटक केली, ते सांगत नाहीत. मुलभूत हक्कांची जबाबदारी ज्यांच्यावर आहेत, त्यांचे कर्तव्य सांगायला हवे."मी जास्त पाने होऊ शकतात. तरी असा प्रश्न विचारणारे नेते संसदेत करतात, हे लाजिरवाणे आहे. इतरांची अप्रतिष्ठा करणारे लोक संसदेत जातात, त्यांचे काय करायचे? हा संसदेचा अपमान नाही का?," असा सवाल सरोदे यांनी उपस्थित केला.

# एमपीएससी पास झालेल्या भोजने सख्ख्या बहिणींचा खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते गौरव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** घरचे अठराविश्व दारिद्र्य, आर्थिक परिस्थितीमुळे पाचवी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या वडीलाचा गॅरेजचा तोडका- मोडका व्यवसाय, सहा माणसांचं कुटुंब चालविण्यासाठी सुरू असलेली वडिलांची धडपड, जिथे घर चालवण्याची चिंता तिथे मुला-मुलींच्या शिक्षणाचा तर विचारच न केलेला बरा. परंतु वडिलांच्या जिद्दीमुळे मुलींनी केलेला दृढनिश्चय कामाला आला आणि कामगार वस्ती परिसर असलेल्या गवळी वस्तीमधील आठ पत्र्याच्या घरातील गॅरेज चालक ज्योतीराम भोजने यांच्या दोन्ही मुली कु. संजीवनी ज्योतीराम भोजने आणि कु. सरोजिनी ज्योतीराम भोजने अश्या दोन सख्ख्या बहिणीनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशाचा झेंडा रोवला.

याबद्दल खासदार प्रणिती ताई शिंदे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन या दोघी बहिणींचा सत्कार केला. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन भाऊ नरोटे, मा. नगरसेवक मनोज यलगुलवार, मा. नगरसेवक गणेश वानकर, तिरुपती परकीपंडला आदी उपस्थित होते.

# आत्मविश्वास हाच यशाकडे नेणारा मार्ग- जगताप



**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** आपल्याला कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर आत्मविश्वास हवा. आत्मविश्वासाने अशक्य गोष्टी शक्य करता येतात. आत्मविश्वास हाच यशाकडे नेणारा मार्ग आहे. परीक्षेला सामोरे जाताना आत्मविश्वासाने जा. यश तुमची वाट पाहत आहे. असे उदगार जिल्हा परिषद दक्षिण सोलापूर चे शाखा अभियंता राजेश जगताप यांनी काढले. ते सद्संकल्प शिक्षण समूहाच्या विश्वभूषण विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना एसएससी बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या शुभेच्छा समारंभ कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक सचिव समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर हे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष रमेश लोखंडे, बशीर शेख, रशीदाबानो शेख, मंजुश्री खंडागळे, सत्यवान पाचकुडवे जय बाळशंकर, भाग्यश्री स्वामी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीस मान्यवरांच्या शुभहस्ते माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पुढे बोलताना जगताप म्हणाले की, आयुष्यात मोठे झाल्यावर आई-वडिलांना विसरू नकात. आई वडील हेच खरे आपले दैवत आहेत. यावेळी रमेश लोखंडे, बशीर शेख, रशिदाबानो शेख यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय स्थानावरून बोलताना अण्णासाहेब भालशंकर म्हणाले की, परीक्षा म्हणजे स्वतःच्या आत डोकावून पाहण्याची संधी असते. प्रामाणिकपणाने परीक्षा द्या. परीक्षेला न घाबरता सामोरे जा. यावेळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण पाटील, अंजली इरवाडकर, सुहाना मकानदार यांनी केले. प्रास्ताविक शाहीन शेख हिने केले तर आभार प्रणाली गायकवाड हिने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वभूषण विद्यालय आणि राष्ट्रसंत प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# राष्ट्रीय लोक अदालतीचे 22 मार्चला आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य विधी सेवा प्राधिकरण, यांचे निर्देशानुसार सन 2025 सालातील पहिले राष्ट्रीय लोकअदालत दि. 22 मार्च 2025 रोजी सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आलेले आहे. या लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, कलम 38 एन. आय. ॲक्ट ची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भुसंपादन बाबतची प्रकरणे, तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, नॅक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थित राहणेकरीता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे.

सदरच्या लोकन्यायालयात ई-चलनाच्या प्रकरणात एस.एम.एस. द्वारा वाहनधारकांच्या मोबाईलवर नोटीसा पाठविले जात आहेत. सदर चलनानुसार नोटीसमध्ये नमूद लिंकवर ऑनलाइनव्दारे चलनाची रक्कम भरता येवू शकते. तसेच महा ट्राफिक या ॲपवरसुध्दा सदर रक्कम भरता येवू शकते. या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील कोणत्याही जवळच्या वाहतूक शाखेमध्ये जावून सदर रक्कम भरता येवू शकते. धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेशाची थोडी रक्कम भरुन प्रकरण निकाली काढता येणे शक्य होणार आहे. धनादेशाची रक्कम एक रकमी देता येणे शक्य नसल्यास ठरलेल्या रक्कमेचे हप्ते बांधून घेणे शक्य होणार आहे. काही रक्कम लोकअदालती दिवशी देवून उर्वरीत रक्कमेबाबत तडजोड हुकुमनामा करणे व संपुर्ण फौजदारी प्रकरण निकाली निघणे शक्य होणार आहे. सदर राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त पक्षकारांनी आपाली प्रकरणे तडजोडीने मिटवुन लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा यांनी केले आहे.

**लोकन्यायालयाचे फायदे**

प्रकरणाचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा उलट तपासणी, दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात.

लोकन्यायालयाच्या निवाडयाविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्ट बाजीतून कायमची सुटका होते.

लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समझोतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार. लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो. परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही. न्यायालयाच्या हुकुमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. होणा-या वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

# दीपक जगताप यांची ऑस्ट्रेलिया - सिडनी येथे संमेलन व अभ्यास दौऱ्यासाठी निवड



**माढा (कटूसत्य वृत्त):-** दीपक जगताप यांची ऑस्ट्रेलियाझ सिडनी येथील कॉर्पोरेट क्लब च्या विशेष संमेलनासाठी व विमा विषयक अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे.

उपळाई (खुर्द) ता. माढा येथील आणि सोलापूर जिल्ह्यातील एकमेव COT (कोर्ट ऑफ द टेबल) आंतरराष्ट्रीय स्तरावरील बहुमान प्राप्त आणि सलग पाच वर्षापासून कॉर्पोरेट क्लब सदस्यता मेंबर असलेले एकमेव विमा प्रतिनिधी दिपक महादेव जगताप यांची भारतीय आयुर्विमा महामंडळ (LIC) यांचे वतीने दिनांक १८ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान ऑस्ट्रेलिया - सिडनी येथे कॉर्पोरेट क्लब संमेलन पार पडणार आहे. विमा विषयक अभ्यास दौऱ्यासाठी जगताप यांची निवड झाली आहे.

विमा बद्दलचे सखोल ज्ञान व ग्राहकांना गरजेनुसार उपाय योजना ते प्रामाणिकपणे करत असतात. सोलापूर जिल्ह्यातून एकमेव आणि संपूर्ण भारत देशातून १४ लाख विमा प्रतिनिधी पैकी फक्त २०८ विमा प्रतिनिधीची या कॉर्पोरेट क्लब च्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली असून या मध्ये श्री. जगताप यांचा समावेश आहे.

माढा तालुक्यातील उपळाई (खुर्द) या ग्रामीण भागातील दिपक जगताप यांनी जिद्दीच्या जोरावर विमा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कार मिळवत आत्तापर्यंत 28 MDRT पूर्ण करून मागील पाच वर्षापासून COT (कोर्ट ऑफ द टेबल) चे सदस्यत्व ही त्यांनी मिळवले आहे मागील 22 वर्षापासून वीमा सेवेत कार्यरत राहत 2600 पेक्षा जास्त कुटुंबीयांना आर्थिक संरक्षण पुरवित आहेत.

या अगोदरही जगताप यांनी विविध देशात आंतरराष्ट्रीय विमा परिषदेला भारताकडून LIC OF INDIA चे प्रतिनिधित्व ही केले आहे आणि आता ऑस्ट्रेलिया सिडनी येथे या कॉर्पोरेट क्लब संमेलनासाठी ते LIC OF INDIA कडून जात आहेत त्यांना या परदेश दौऱ्यासाठी पुणे विभाग 2 चे वरिष्ठ प्रबंधक अजय सपाटे, मार्केटिंग मॅनेजर श्रीधरजी पात्रे, मार्केटिंग सेल्स मॅनेजर भरतजी दिवे, वरिष्ठ शाखा प्रबंधक 94 सोलापूरचे कृष्णाजी माळी साहेब, उपशाखा प्रबंधक दादासो होनमाने, सेवानिवृत्त उपशाखा अधिकारी मोहनजी कदम यांच्यासह अनेकांनी दिपक जगताप यांना परदेश दौऱ्यास शुभेच्छा देऊन सन्मान केला.

# अंगणवाडीताईंच्या प्रश्नावर संसदेत आवाज उठवावा - राहुल गांधी यांना साकडे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रासह देशातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंवित

प्रश्नासंदर्भात संसदेत आवाज उठवावा, अशी मागणी अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या शिष्टमंडळाने काँग्रेसचे नेते,खा. राहुल गांधी यांच्याकडे केली. दिल्ली येथे अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या शिष्टमंडळाने खा. प्रणिती शिंदे यांच्या मध्यस्थीने खा. गांधी यांची भेट घेतली. यावेळी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे प्रदेश कार्याध्यक्ष सूर्यमणी गायकवाड, राजेश सिंह आदी उपस्थित होते. सर्वोच्च आदेशाप्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युटी मिळाली पाहिजे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे न्यायालयाच्या पद हे वैधानिक आहे. त्यांना शासकीय सेवेचा दर्जा मिळाला पाहिजे, गुजरात उच्च न्यायालयाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा आदेश दिला आहे. या आदेशाची अंमलबजावणी होत नाही. यावावत आपण लोकसभेत आवाज उठवून देशातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी यावेळी शिष्टमंडळाने गांधी यांच्याकडे केली.वालकांच्या आहारासाठी २०१७ पासून आजपर्यंत प्रतिदिनी प्रतिलाभार्थी फक्त आठ रुपये देण्यात येतात. मागील नऊ वर्षात यात कोणतेही वाढ करण्यात आली नाही. त्यामुळे बालकांना सकस आहार देणे शक्य होत नाही. उलट कुपोषण वाढण्याची भीती निर्माण झाली आहे, असे सूर्यमणी गायकवाड यांनी खासदार गांधी यांना सांगितले असता, गांधी यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंवित प्रश्नावावत लोकसभेमध्ये आवाज उठवून देशातील २६ लाख अंगणवाडीताईना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश, विहार या राज्यातील अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे प्रमुख पदाधिकारी व अंगणवाडी कर्मचारी उपस्थित होते.

# भक्तस्नेही संकल्पना ह्या उत्कृष्ठ असून, परिसरात वसुंधरेची जपणूक चांगल्या प्रकारे झाली - अंधारे



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून भक्तस्नेही संकल्पना ह्या उत्कृष्ठ असून, परिसरात वसुंधरेची जपणूक चांगल्या प्रकारे झाली असल्याचे मनोगत राज्याच्या अल्पसंख्याक विभागातील कक्ष अधिकारी प्रशांत अंधारे मंत्रालय, मुंबई यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे अतिश पवार, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, संभाजीराव पवार, सागर पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, धनंजय निंबाळकर, मुन्ना कोल्हे, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे रानमसलेत समृध्द गाव स्वच्छता अभियान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराच्या माध्यमातून लोकमंगल समृद्ध गाव योजनेअंतर्गत रानमसले येथे ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाअंतर्गत मौजे रानमसले ता उत्तर सोलापूर येथील अंगणवाडी परीसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अंगणवाडी परिसरातील वाढलेले गवत व झाडांच्या आजूबाजूला असलेल्या काटेरी गवताळ झुडुपे काढण्यात आली. यामध्ये महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमासाठी रानमसले गावचे सरपंच श्री मनोहर क्षिरसागर व उपसरपंच मा श्री रमेश सुतार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यासोबतच रोसेयो शिबीराअंतर्गत पार पडलेल्या रक्तक्षय तपासणी शिबीराचे अहवाल शिबिरातील ब्रम्हगायत्री विद्यामंदिर कृषी व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सहभागी शालेय विद्यार्थीनींना वितरित करण्यात आले. याप्रसंगी प्रा. आशिष सरकाळे, प्रा. अंकिता पवार तसेच रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. या अभियानासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा सागर महाजन तसेच संस्थेचे अध्यक्ष मा रोहनजी देशमुख व सचिव डॉ सौ अनिता ढोबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# मराठा महासंघाच्या युवक अध्यक्षपदी जयकुमार केचे पाटील यांची निवड



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य या सामाजिक संघटनेच्या सोलापूर जिल्हा युवक अध्यक्षपदी लवंग ता माळशिरस येथील जयकुमार तुकाराम केचे पाटील यांची नुकतीच निवड झाली असून या निवडीबद्दल सकल मराठा समाज माळशिरस तालुक्याच्या वतीने जयकुमार केचे पाटील यांचा सत्कार करण्यात आला यावेळी सकल मराठा समाजाचे धनाजी साळकर ,अण्णासाहेब शिंदे बबनराव शेंडगे ,मराठा सेवा संघाचे रवींद्र पवार डॉ. अमोल माने शेंडगे, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रिया नागणे आदी मान्यवर उपस्थित होते.

मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा हे ब्रीदवाक्य घेऊन स्व. अण्णासाहेब पाटील यांनी स्थापन केलेल्या मराठा महासंघाचे कार्य सोलापूर जिल्ह्यात सर्वदूर असून या मराठा महासंघाची युवकांची फळी तयार करून जास्तीत जास्त युवकांना सामाजिक कार्यात सहभागी करून समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात मराठा महासंघ नेहमीच अग्रेसर असतो अशा या मराठा महासंघाचे सोलापूर जिल्हा सचिव गणेश चव्हाण यांनी जयकुमार केचे पाटील यांच्या निवडीचे नुकतेच पत्र दिले आहे त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

सोलापूर जिल्हा युवक अध्यक्ष पदाची माझ्यावर जी जबाबदारी टाकली आहे ती जबाबदारी मा आ नरेंद्र पाटील यांच्या जिल्हा सचिव गणेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांना सोबत घेऊन पार पाडणार असून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून जास्तीत जास्त युवकांना उद्योग व्यवसायात सहभागी करून घेण्यासाठी यापुढे प्रयत्न राहील

**जयकुमार केचे पाटील,**
जिल्हा युवक अध्यक्ष मराठा महासंघ सोलापूर

# शिवजन्मोत्सवानिमित्त १८ फेब्रुवारीला माढ्यात भगवी मोटारसायकल रॅली

**माढा (कटूसत्य वृत्त):-** कुळवाडी भुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त माढ्यात शिवसेना शिदे गटाचे तालुका प्रमुख मुन्ना साठे यांच्या वतीने भव्य भगवी मोटारसायकल रॅली १८ फेब्रुवारी रोजी काढण्यात येणार आहे. माढा वैराग मार्गावरील सम्राट पेट्रोल पंपासमैरुन रॅलीला सकाळी १० वाजता सुरुवात होईल. रॅलीचे उद्घघाटन शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांच्या हस्ते भगवा ध्वजं दाखवून होणार आहे.मोटारसायकलला भगवे ध्वंज लावून भगवे फेटे परिधान करुन जय शिवरायचा जयघोष करीत शहरातील प्रमुख मार्गावरुन ही रॅली निघणार असून छत्रपती शिवाजी महाराज चौकात रॅलीची सांगता होईल.शिवभक्तांनी रॅलीत बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन मुन्ना साठे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आयुष्यात काही करायचं असेल शिक्षण हेच एकमेव साधन

## वसतिगृहातील विद्यार्थ्यांना ट्रॅकसूट वाटप



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** तुम्ही कुठे जन्माला अलात, कसे दिसतात याला काहीही महत्व नाही तर तुमच्याकडे वेगळेपण काय आहे हे महत्वाचे आहे आयुष्यात जर काहीतरी करून दाखवायची जिद्द असेल तर त्यासाठी शिक्षण हेच एकमेव साधन आहे शिक्षणामुळे प्राप्त झालेल्या ज्ञानावर अनेक संधी मिळतील असं प्रतिपादन आयटी इंजिनिअर अविनाश गायकवाड यांनी केले डॉ जीवन बारबोले व गायकवाड यांच्या वतीने शिवजयंती निमित्त गांधी छत्रालय येथील विद्यार्थ्यांना ट्रॅकसूट वाटप करण्यात आले यावेळी शिवाजी शिक्षण संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, अध्यक्षा श्रीमती विजया देशमूख,दिनेश बोराडे, प्रकाश शिंगण, अखिल देशमूख,पत्रकार शहाजी फुरडे पाटील, संजय बारबोले,वर्षा बोराडे, विजय शिंगाडे वसतिगृह अधीक्षक संजय शिंदे,आदी उपस्थित होते. यावेळी डॉ जीवन बारबोले म्हणाले की, नैसर्गिक बुद्धिमत्ता सवार्ना सारखीच असते तुम्ही किती अभ्यास करता त्यावर तुमचे यश अवलंबून असते. शिक्षण, आरोग्य, निवारा, अशा मूलभूत गरजा आता बऱ्यापैकी पोहचलेल्या आहेत आता मानसिक तणाव, नैराश्य आणि आत्महत्या सारखे प्रकार याबाबत विस्ताराने चर्चा करून मोबाईलमध्ये अडकलेल्या तरुणांना बोलतं करण्याची गरज आहे असं सांगत विद्यार्थ्यांना व्यायाम आणि मैदानी खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणून आम्ही केलेला हा छोटासा प्रयत्न आहे असं सांगितले. यावेळी संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात मशरूम लागवड कार्यशाळा संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** दजेर्दार स्पॉन वापरून मशरूमचा भविष्यामध्ये फायदेशीर व्यवसाय करता येईल असे मत डॉ.टी.एस.रोडगे यांनी व्यक्त केले. शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये वनस्पतीशास्त्र विभागामार्फत मशरूम लागवड या संबंधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून अनगर येथील बाबुराव पाटील आर्ट्स अँड सायन्स महाविद्यालयाचे प्रा.डॉ.टी.एस रोडगे हे होते.

त्यांनी या कार्यशाळेमध्ये मशरूमचे प्रकार आणि त्याची उपयुक्तता याविषयी माहिती देऊन मशरूम लागवडीविषयी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.तसेच या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.टिळेकर यांनी नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० मध्ये शासन कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम समाविष्ट करीत आहे तरी विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे कोर्सेस करून कौशल्य विकसित केली पाहीजे.असे मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.एम सातपुते यांनी केले.

ही कार्यशाळेस शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते- पाटील,सचिव अभिजीत रणवरे व सहसचिव हर्षवर्धन खराडे- पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी. एम.धाईजे यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार प्रा.व्ही.एम.कुंभार यांनी मानले.ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ.एस.एच.वाघ, प्रा. डी.एफ.देशमुख,ए.ए.साठे आणि प्रयोगशाळा परिचारक बी.बी.कदम यांचे सहकार्य लाभले.